स.के.नं. ३०३/२०१३
नि.क्र. २२/क पुढे

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १ रूपाली मोहन मोकल यांचा सरतपास सरकारी वकील श्रीमती पवार यांचेव्दार पुन्हा सुरू**

( मुद्देमाल मध्ये असलेली सिडी चालू करण्याची सुविधा न्यायालयात नस्ल्याने त्यातील फाईल पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून ती फाईल न्यायालयातील संगणकावर चालवून पाहिली असता त्यातील पहिली फाईल ही ९ मिनीट ४३ सेकंदाची असल्याचे आढळून आले.)

१ सदर सि.सि.टी.व्ही फुटेज हे मि तपासा अधिका-यांना दिलेले फुटेज आहे. ते फुटेज घटना घडल्याचे आधीपासूनच्या कालावधीचे आहे. सदर पुर्ण क्लिप पाहिली असता केवळ एक ॲटोरिक्षा उभा असलेला दिसून येतो. या व्यतिरिक्त काहीही सदर फुटेज मध्ये मिळून आलेले नाही.

२ त्यानंतर दुसरे फाईलमधील फुटेज चालवून पाहिले असता एक फुटेज एक तास एक मिनिट व ५० सेकंद कालावधीचे असल्याचे आढळून आले. सदर फुटेज दिनांक २५.०५.२०१३रोजीचे असल्याचे आढळून येत असून त्यामध्ये १८.३०.०५ यावेळेत आरोपी क्रमांक १ विमल ही येत असल्याचे दिसून येते. तसेच ती काहीतरी बोलत असल्याचे तिचे हावभावावरून लक्षात येते. आरोपी ही त्यामध्ये शिवीगाळ करत असल्याचे साक्षीदार यांनी सांगितले. आरोपी ही त्यामध्ये हातवारे करताना व जोरजोराने ओरडत असल्याचे सुध्दा आढळून येते. त्यानंतर १८.३४.१० या वेळेच्या सुमारास एक दुसरी महिला तेथे आल्याचे ती दिसून येते. ती दुसरी महिला आरोपी क्रमांक २ अश्विनी असल्याचे साक्षीदार सांगतात. १८.३४.५० च्यासुमारास त्या दोनही महिला तेथून निघून जात असल्याचे दिसून येतात. सदर फुटेजमध्ये दिसून येणारे इतर दृश्य नसल्याचे साक्षीदार यांनी सांगितली. दाखल केलेले फोटो हे बरेच कालावधी असल्याने त्यातील कोणतेही दृश्य समजून येण्यालायक दिसून येत नाही. आज रोजी दोनही आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री आर. आर. मोमीन यांचेव्दारा**

३ प्रश्न : तुमचे वडील आरोपीचे वकील होते हे फिर्यादमध्ये नमुद आहे?

उत्तर: भाडोत्रींच्या विरूध्द असलेल्या प्रकरणात माझे वडील अरोपीचे वकील होते. मी सन २०११ पासून वकील व्यवसाय करते. हे म्हणणे खरे नाही की, दिवाणी दावा क्रमांक १८९/१९८९ तसेच दरखास्त क्रमांक ६/२००१ या प्रकरणामध्ये मी वकील म्हणून काम पाहिले. दिवाणी दावा क्रमांक ६९/२०१३ हा माझे वडीलांनी आरोपींनी केलेल्या अतिक्रमित जागेवरील ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. हे मला आठवत नाही घटना ही सदर दावा दाखल केल्यानंतर घडली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी माझे वडीलांविरूध्द दिवाणी दावा क्रमांक ११७/२०१२ दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाखवण्यात आलेल्या फुटेज मधील भाग हा माझे घराचे मागील बाजूचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सि.सि.टी.व्ही कॅमेरा आमचे घराचे पाहिला माळयावर लावला आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, पहिल्या माळयावर दक्षिण बाजूला लावला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सि.सि.टी.व्ही फुटेज मध्ये दिसलेली जागा ही आरोपींच्या घराकडे जाणा-या रस्त्याची आहे. हे म्हणणे खरे नाही की, फुटेज मध्ये आरोपी रस्त्याकडे पाहून बोलत होत्या. पहिल्या फुटेज मध्ये दिसत असलेली अॅटोरिक्षा कोणाची आहे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे घराला लागून उरण ते करंजा जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील आरोपीचे वकील होते. आम्ही राहत असलेले घर दिनांक २८.१२.२००५ रोजी आरोपी क्रमांक१ विमल व इतर सह हिस्सेदाराकडून नोंदणीकृत खरेदीखताने घेतलेले आहे. हे मला माहित नाही की, वकील असल्यास पक्षकाराची जागा विकत घेता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी आरोपी विरूध्द नियमित फौजदारी खटला क्रमांक ३/२०१५ दाखल केला आहे. आता मला आजरोजी आरोपीतर्फे दाखल करण्यात येत असलेले दरखास्त क्रमांक ६/२००१ मधील रोजनामा दिनांक २२.०७.२०१९ ते १५.०३.२०२१ या कालावधीचे रोजनामे दाखवले त्यामध्ये

फिर्यादीचे वकील श्री एम.एम.मोकल लिहले असून तो मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली.

**श्रवणोत्तर स्विकृत**

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – ११/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण**